**ठळक बातम्या**

- सर्वधर्मीयांच्या तीर्थक्षेत्रांसाठी मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना लागू करण्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचं आश्वासन
- जालन्यात समृद्धी महामार्गावर झालेल्या अपघातात ६ जणांचा मृत्यू
- राष्ट्रीय चाचणी संस्थेकडून विविध प्रवेश परीक्षांच्या तारखा जाहीर,  यूजीसी-नेट परीक्षा २१ ऑगस्ट ते ४ सप्टेंबरदरम्यान होणार
- अमेरिकेच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचा ‘आंतरराष्ट्रीय धार्मिक स्वातंत्र्य २०२३’ हा अहवाल पूर्वग्रहदूषित असल्याचं सांगत भारतानं फेटाळला

  **आणि**
- टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेच्या विजेतेपदासाठी आज भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात अंतिम सामना

**<><><><><>**

सर्वधर्मीयांच्या तीर्थक्षेत्रांसाठी मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना लागू करण्याचं आश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज विधानसभेत दिलं. तातडीनं अंमलबजावणी करण्यासाठी, लवकरच नियमावली तयार करून इच्छुकांकडून ऑनलाईन अर्ज मागवू, असं ते म्हणाले. आमदार प्रताप सरनाईक यांनी यासंदर्भातली लक्षवेधी सूचना मांडली होती.

**<><><><><>**

पेपरफुटीमुळे विद्यार्थ्यांचं नुकसान होऊ नये, यासाठी सरकार बांधिल आहे. यासंदर्भात विरोधी पक्षानं दिलेल्या सूचनांचा सकारात्मक विचार करेल , असं आश्वासन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज विधानसभेत दिलं. विरोधी पक्षनेते

विजय वडेट्टीवार, माजी अध्यक्ष नाना पटोले आदी सदस्यांनी विधानसभेत 'नीट' परीक्षेत झालेल्या गैरप्रकाराचा मुद्दा स्थगन प्रस्तावाद्वारे उपस्थित केला होता. मात्र, अध्यक्षांनी स्थगन फेटाळल्यानंतरही सभागृहात यासंदर्भात पवार यांनी निवेदन दिलं.

**<><><><><>**

जनतेला विश्वासात घेऊन आणि स्थानिक शेतकऱ्यांशी संवाद साधूनच राज्यातील प्रस्तावित शक्तीपीठ महामार्गाची पुढची प्रक्रिया केली जाईल,अशी ग्वाही सार्वजनिक बांधकाम उपक्रम मंत्री दादा भुसे यांनी आज विधानपरिषदेत दिली. या महामार्गाला शेतकऱ्यांचा विरोध असल्याचं सांगत हा महामार्ग रद्द करावा अशी मागणी काँग्रेसचे सतेज पाटील यांनी आज लक्षवेधीच्या माध्यमातून केली.

**<><><><><>**

विधानपरिषदेच्या सभापतीपदाची निवडणूक लवकरात लवकर जाहीर करावी अशी मागणी आज विरोधकांनी विधानपरिषदेत केली. गेले अनेक दिवस विधानपरिषदेचं सभापतीपद रिक्त आहे हे संविधानाला धरून नाही असं सांगत शेकापचे जयंत पाटील यांनी आज कामकाज सुरू होताच हा मुद्दा उपस्थित केला. विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी देखील जयंत पाटील यांच्या मुद्द्याला समर्थन देत लवकरात लवकर निवडणूक घेण्याची मागणी केली. चर्चेच्या माध्यमातून सर्वसहमतीनं देखील सभापती निवडण्याची विरोधकांची तयारी आहे, असं ते म्हणाले. या संदर्भात निर्णय घेण्यासाठी सरकारला थोडा वेळ द्यावा ,सोमवारी गटनेत्यांच्या बैठकीत यावर चर्चा करता येईल असं उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><><>**

राज्याच्या तिजोरीत खडखडाट असताना अर्थसंकल्पात अनेक भुलथापा देण्यात आल्याचा आरोप करत विरोधकांनी आज विधानभवनाच्या पायऱ्यांवर आंदोलन केलं. लोकसभा निवडणुकीतल्या पराभवामुळं विधानसभा निवडणुकीपूर्वी जनतेला आकृष्ट करण्यासाठी या गोष्टी सुरू असल्याचा विरोधकांचा दावा होता.

**<><><><><>**

महाराष्ट्रात मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गावर काल रात्री झालेल्या अपघातात ६ जण ठार आणि ४ जण जखमी झाले. जालना जिल्ह्याच्या हद्दीत कडवंची गावाजवळ हा अपघात झाला. या दुर्घटनेतले मृत आणि ३ जखमी मुंबईचे रहिवासी होते.

**<><><><><>**

तेलंगणातल्या रंगा रेड्डी जिल्ह्यातल्या शादनगर इथं काल एका काच कारखान्यात झालेल्या स्फोटात ५ जण ठार झाले तर १४ जण जखमी झाले आहेत. गॅस कॉम्प्रेसरचा स्फोट होऊन ही दुर्घटना झाली.

**<><><><><>**

नॅशनल टेस्टिंग एजन्सी - एनटीएनं रद्द केलेल्या आणि पुढे ढकललेल्या परीक्षांच्या तारखा जाहीर केल्या आहेत. एनटीएनं काल जाहीर केलेल्या अधिसूचनेत यूजीसी-नेट जून २०२४ ची परीक्षा २१ ऑगस्ट ते ४ सप्टेंबरदरम्यान घेतली जाणार आहे. परीक्षेत गैरप्रकार झाल्याचं उघडकीस आल्यामुळे ही परीक्षा रद्द  करण्यात आली होती.

संयुक्त CSIR-UGC-NET परीक्षाही पुढे ढकलण्यात आली होती. ती आता २५ ते २७ जुलै दरम्यान घेण्यात येईल. एकात्मिक शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम-ITEP मध्ये

प्रवेशासाठी घेतली जाणारी राष्ट्रीय सामाईक प्रवेश परीक्षा १० जुलै रोजी होणार आहे. अखिल भारतीय आयुष पदव्युत्तर प्रवेश परीक्षा २०२४ ही मूळ वेळापत्रकानुसार ६ जुलैला घेतली जाणार असल्याचं एनटीएनं सांगितलं. तसंच उमेदवारांनी अधिक माहितीसाठी www.nta.ac.in या संकेतस्थळाला भेट देण्याचा सल्लाही एनटीएनं दिला आहे.

**<><><><><>**

अमरनाथ यात्रेसाठी जम्मूतल्या भगवती नगर बेस कॅम्प इथून चार हजार २९ यात्रेकरूंची दुसरी तुकडी रवाना झाली. कडेकोट सुरक्षेसह यात्रेकरूंच्या २०० वाहनांचा ताफा काश्मीर खोऱ्याकडे रवाना झाला. जम्मू बेस कॅम्प इथून आतापर्यंत आठ हजार ६३२ यात्रेकरू अमरनाथ यात्रेसाठी रवाना झाले आहेत.

**<><><><><>**

अमेरिकेच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचा 'आंतरराष्ट्रीय धार्मिक स्वातंत्र्य २०२३' हा अहवाल पूर्वग्रहदूषित असल्याचं सांगत भारतानं तो फेटाळला आहे. भारतातील सामाजिक रचनेविषयीचं अज्ञान या अहवालातून दिसून येत असून तो मतपेढीनं प्रेरित आणि पूर्वग्रहदूषित असल्याचं दिसत असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी म्हटलं आहे. ते काल नवी दिल्ली इथं वार्ताहरांशी बोलत होते. एकतर्फी आणि पक्षपाती स्रोत, निवडक विशिष्ट घटना यावर अहवाल बेतलेला असल्याचं ते म्हणाले. या अहवालात देशातील काही कायद्यांबाबतही प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आलं आहे. मात्र अमेरिकेत यापेक्षा अधिक कठोर कायदे आणि निर्बंध असल्याचं जयस्वाल यांनी सांगितलं. मानवाधिकार आणि विविधतेचा सन्मान हे भारत आणि अमेरिकेतले चर्चेचे विषय राहिले असून पुढेही ते

राहतील, मात्र अशा प्रकारचा संवाद दुसऱ्या देशात परकीय हस्तक्षेपाचा परवाना बनता कामा नये, असं जयस्वाल म्हणाले.

**<><><><><>**

अमेरिकेचे परराष्ट्र व्यवहार मंत्री अँटोनी ब्लिंकेन यांच्या वक्तव्याचा भारतातल्या विविध धर्मांच्या धर्मगुरूंनी तीव्र निषेध केला आहे. भारतात द्वेषपूर्ण भाषण आणि धर्मांतरविरोधी कायद्यातली वाढ चिंताजनक असल्याचं ब्लिंकेन यांनी म्हटलं होतं.

अखिल भारतीय सूफी सज्जादानशीन परिषदेचे अध्यक्ष आणि अजमेर दर्ग्याच्या अध्यात्मिक गुरूंचे उत्तराधिकारी सैय्यद नसीरुद्दीन चिस्ती यांनी अमेरिकी अहवाल चुकीचा आणि बनावट असल्याचं म्हटलं आहे.

अजमेरच्या चिश्ती फाउंडेशनचे अध्यक्ष हाजी सय्यद सलमान चिश्ती यांनी हा अहवाल फेटाळला आहे. इतर देशांची मतं महत्त्वाची नसल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

केंद्रीय सिंग सभा गुरुद्वाराचे अध्यक्ष निर्मल सिंग यांनी या अहवालावर टीका केली आहे. भारताचा सध्या सुवर्णकाळ असून प्रत्येक धर्माला संसदेत प्रतिनिधीत्व मिळालं असल्याचं ते म्हणाले.

भारतीय सर्वधर्म संसदेचे राष्ट्रीय समन्वयक महर्षी भृगु पीठाधीश्वर गोस्वामी सुशील महाराज यांनी हा अहवाल म्हणजे देशाला दुर्बल करण्याचा एक प्रयत्न असल्याचं म्हटलं आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या रविवारी आकाशवाणीवरच्या मन की बात या कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधणार आहेत. या मालिकेच्या तिसऱ्या आवृत्तीचा हा पहिला भाग असेल. आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवरून सकाळी ११ वाजता हा कार्यक्रम प्रसारित होईल. समाजमाध्यमांवरही हा कार्यक्रम ऐकता येईल.

**<><><><><>**

लडाखमध्ये दौलत बेग ओल्डी परिसरात मंदिर मोर्घ इथं प्रत्यक्ष रेषेजवळ टी - सेव्हेन्टी टू हा रणगडा नदीत बुडून झालेल्या अपघातात पाच जवान शहीद झाले. लष्करी प्रशिक्षण कवायतीचा भाग म्हणून काल रात्री हा रणगाडा श्योक नदी ओलांडत होता. त्यावेळी तो उलटून पाण्यात बुडाल्याचं संरक्षण दलाच्या निवेदनात म्हटलं आहे. यावेळी नदीची पाणी पातळी अचानक वाढलेली होती, तसंच पाण्याचा प्रवाह देखील जास्त होता, त्यामुळे बचाव कार्याला यश आलं नाही अशी माहितीही या निवेदनात दिली आहे.

**<><><><><>**

वेस्ट इंडिजमध्ये सुरु असलेला टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक आता आपल्या अखेरच्या टप्प्यावर आला आहे. स्पर्धेच्या विजेतेपदासाठी आज बार्बोडस इथं भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात अंतिम सामना होईल. भारतीय प्रमाणवेळेनुसार रात्री आठ वाजता हा सामना सुरू होईल.

महत्वाचं म्हणजे अंतिम फेरीत पोहोचलेल्या भारत आणि दक्षिण आफ्रिकेनं आत्तापर्यंत एकही सामना गमावलेला नसून, सुरुवातीची गटसाखळी फेरी, त्यानंतर सुपर एक फेरीत हे दोन्ही संघ आपापल्या गटात अव्वल स्थानीच राहिले होते.

विश्वचषकाच्या अंतिम फेरीत दोन अपराजित संघ पोहचण्याची ही पहिलीच वेळ आहे. दक्षिण आफ्रिकेनंही आपल्यावरचा चोकर हा शिक्का पुसत पहिल्यांदाच कोणत्याही विश्वचषकाच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. त्यामुळे आपलं पहिलंच विश्वचषक जेतेपद पटकावण्यासाठी ते जीवाचं रान करतील यात शंकाच नाही.

भारतानं २००७ मध्ये झालेल्या पहिल्या टी-ट्वेंटी क्रिकेट क्रिकेट विश्वचषक स्पर्धेचं महेंद्रसिंग धोनी याच्या नेतृत्वात विजेतेपद पटकावलं होतं. मात्र त्यानंतर भारताला पुन्हा कधीही ही स्पर्धा जिंकता आलेली नाही.

**<><><><><>**

टेक्सास इथं सुरू असलेल्या अमेरिकी खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत, भारताच्या मालविका बनसोडनं महिला एकेरीच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. उपांत्यपूर्व फेरीत मालविकानं स्कॉटलँडची बॅडमिंटनपटू क्रिस्टी गिल्मोरचा १०-२१, २१-१५, २१-१० असा पराभव केला. उपांत्य फेरीत मालविकाचा सामना आज रात्री जपानच्या नात्सुकी निदरियाशी होईल.

पुरुष एकेरीत मात्र उपांत्यपूर्व फेरीत प्रियांशु राजावतला चीनच्या लेई लान्क्सीकडून २१-१५, ११-२१, १८-२१ असा पराभव पत्करावा लागला. महिला दुहेरीतही त्रिशा जॉली आणि गायत्री गोपीचंद या जोडीला जपानच्या रुई हिरोकामी आणि यूना काटो जोडीकडून १७-२१, २१-१७, १९-२१ पराभव पत्करावा लागला.

**//<><><><><>//**

आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय  बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
२९ जून २०२४ - शनिवार